67/2018

# केंद्रशासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

**याच्या कलम १९(१)अन्वये अपिल**

माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,
**श्री. दिपक खांबीत,**
**प्रथम अपिलीय अधिकारी,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग ,**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

| | | |
|---|---|---|
| १ | अपिल काराचे पुर्ण नांव | **श्री. विलास विष्णू म्हात्रे**<br>**मो.नं. ९३२०२३१२३२** |
| २ | अपिलकाराचा पुर्ण पत्ता | **तिर्थराज, बंदरआळी, मोर्वा गांव, उत्तन रोड, भाईंदर-पश्चिम, ता.जि. ठाणे- ४०१ १०१** |
| ३ | जनमाहिती अधिका-याचा तपशील | जनमाहिती अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी अर्जाची माहिती अधिकारासाठी मुद्देसुद माहिती दिलेली नाही. |
| ४ | पहिल्या अपिल प्राधिकरणाचा तपशिल | दि. २१/०५/२०१८ रोजीच्या माहिती अधिकार अंर्जाची माहिती दिलेली नाही. |
| ५ | ज्या आदेशा विरुध्द अपिल केले असेल तो मिळाल्याची दिनांक | ..... |
| ६ | अपिल दाखल करण्यांची अंतिम तारीख | ४५ दिवस |
| ७. | अपिलाची कारणे | माहितीचा अधिकार अर्जाची मुद्देसुद माहिती दिलेली नाही |
| ८ | माहितीचा तपशिल | माहिती अर्जातील तिन्ही मुद्दया प्रमाणे |
| ९ | १. हव्या असलेल्या माहितीचे स्वरूप आणि विषय | मिरा भाईंदर महानगर पालिकेच्या हद्दीतील प्रभाग क्रं. १, मोर्वा गावातील सार्वजनिक रस्त्यांची माहिती मिळण्यांबाबत. |
| १० | २. माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित आहे त्याचे नांव -: | सार्वजनिक बांधकाम विभाग, माहिती अधिकारी, मिरा-भाईंदर महानगर पालिका |
| | दिनांक : ०४/०६/२०१८ | अपिलकाराची सही |

मि. भा. म. न.
सा. बां. विभाग
आ. क्रं. ५०४ C-7645
दिनांक ५/६/१८

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१
// बांधकाम विभाग //

RIGHT TO INFORMATION

जा.क्र. मनपा/साबां/आ.अ ४९२ /२०१८-१९ दि.११/७/२०१८

अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) अन्वये दाखल झालेले अपिल.

.......................................................................................................

**प्रति,**
**श्री. विलास विष्णु म्हात्रे**
**तिर्थराज, बंदराअली मोर्वा गाव,**
**उत्तन रोड, भाईंदर (प.)** } **अपिलकार**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप-अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**
**ता. जि. ठाणे.** } **उत्तरवादी**

**माहिती अर्ज :- दि. २२/०५/२०१८**
**माहिती उत्तर :- दि. ०१/०६/२०१८**
**अपिल अर्ज :- दि. ०४/०६/२०१८**
**सुनावणी :- दि. ०६/०७/२०१८ रोजी दु. ०३.१० वा.**

**-: पुर्वपिठीका :-**

श्री. विलास विष्णु म्हात्रे यांनी केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि. २२/०५/२०१८ रोजी माहिती अर्ज केलेला आहे. सदर माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा उप-अभियंता यांनी जा.क्रं. मनपा/साबां/४९२/२०१८-१९ दि. ०१/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांना विहीत वेळेत माहितीचे उत्तर दिलेले आहे. परंतु अर्जदार यांना सदर माहिती अपुर्ण व समाधानकारक न मिळाल्यामुळे दि. ०४/०६/२०१८ रोजी अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलाच्या अनुषंगाने अपिलकर्त्यांस दि. ०६/०७/२०१८ रोजी दु . ०३.१० वा. सुनावणीकरीता बोलवण्यात आले होते. सदर सुनावणीच्या अनुषंगाने अपील अर्जदार श्री. विलास विष्णु म्हात्रे व जनमाहिती अधिकारी श्री. किरण राठोड उपस्थित होते.

Mhatre 11/7/18 8.34 p.m.

### न्यायनिर्णय

जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती अर्जदारास जा.क्र. मनपा/साबां/४९२/२०१८-१९ दि. ०१/०६/२०१८ अन्वये माहितीचे उत्तर दिलेले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नियमानुसार कार्यालयात उपलब्ध असलेली दस्तऐवजाच्या स्वरूपातील माहिती अर्जदारास द्यावी लागते. सबब सदर अपिलावर खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

### निर्णय

अर्जदार श्री. विलास विष्णु म्हात्रे यांनी माहिती अधिकारात अपेक्षिलेल्या माहिती अपुर्ण व समाधानकारक न दिल्याने अपिल दाखल करण्यात आले होते, त्याअनुषंगाने दि. ०६/०७/२०१८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर अपिल अर्जानुसार अर्जदाराने माहिती अधिकार अपेक्षिलेल्या माहितीचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा उप-अभियंता यांनी जा.क्रं. मनपा/साबां/४९२/२०१८-१९ दि. ०१/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांना विहीत वेळेत मुद्देनिहाय उत्तराद्वारे कळविलेले आहे. तरी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकारात उपरोक्त संदर्भिय विषयान्वये या विभागातील कार्यालयीन अभिलेख कक्ष तपासले असता या कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये उपलब्ध असलेली माहिती व सहाय्यक माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहीतीनुसार अर्जदारास दिलेली माहिती योग्य असून सदरचा अपिली अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(दिपक खांबित)
**प्रथम अपिलीय अधिकारी**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**स्थळ :-** सार्वजनिक बांधकाम विभाग,
मिरा-भाईंदर महानगरपालिका
दि. ०९/०७ /२०१८

**प्रत** :- १) श्री. विलास विष्णु म्हात्रे तिर्थराज, बंदराअली मोर्वा गाव, उत्तन रोड, भाईंदर (प.)
२) जनमाहिती अधिकारी तथा उप-अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर.